**विषयः**- कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करणे बाबत.( लॉकडाऊनच्या कालावधीत विविध राज्यात/जिल्हयात अडकलेले विस्थापित कामगार / पर्यटक/भाविक/विद्यार्थी व इतर व्यक्ती यांचे परवानगी बाबत )

## जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१/को./सीआर-

दि. ३०/०४/२०२०

वाचाः- १) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२० व दिनांक ३० एप्रिल २०२०

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५

**आदेशः-**

मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे. त्यामध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे व आदेश दिनांक ३० एप्रिल २०२० अन्वये लॉकडाऊनच्या कालावधीत विविध राज्यात/जिल्हयात अडकलेले विस्थापित कामगार /पर्यटक /भाविक/विद्यार्थी व इतर व्यक्तिंना नांदेड जिल्हयात येण्यासाठी व नांदेड जिल्हयात असलेल्या लोकांना त्यांच्या सबंधित राज्यामध्ये/जिल्हामध्ये जाण्याकरिता आवश्यक असणारी परवानगी देण्यासाठी सबंधित जिल्हाधिकारी यांना नोडल अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे.

- **त्यामुळे नांदेड जिल्हयातून राज्यांतर्गत/परराज्यात वरिल प्रमाणे नमूद लोकांना जाण्यासाठी करावयाची कार्यप्रणाली खालील प्रमाणे असेल.**

  १) सबंधित तहसिलदार हे तहसिल स्तरावर अशा लोकांची यादी तयार करतील

  २) यादीनूसार तालूका स्तरावरील कॅम्प किंवा रवानगीच्या ठिकाणी अशा सर्वांची थर्मल व वैद्यकिय तपासणी करुन त्याबाबतचे सबंधित वैद्यकिय अधिकारी यांचेकडून वैद्यकिय प्रमाणपत्र मध्ये घेण्यात यावे.

  ३) सदर तपासणीत कोरोना रोगाचे लक्षणे नसलेल्या व्यक्तिंची यादी ते ज्या राज्यातील आहेत त्या राज्य, जिल्हा, तालूका, गाव या पध्दतीने तयार करण्यात यावी.

  ४) प्रवासासाठी पात्र व्यक्तिंची यादी जिल्हाधिकारी कार्यालयातील समन्वय अधिकारी श्री प्रसाद कुलकर्णी, तहसिलदार सामान्य, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांचेकडे सादर करावी.

  ५) अशा याद्या तहसिलदार यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर व्यक्ति ज्या राज्यात जात आहेत त्या व्यक्तिच्या रहिवास पर्यंतचा रुट प्लॅन तयार करण्यात यावा.

  ६) त्यानंतर सदर यादी माझ्या स्वाक्षरीसाठी सादर करावी.

  ७) यादीस मान्यता प्राप्त झाल्यानंतर सबंधित सक्षम प्राधिकारी/जिल्हाधिकारी यांना ते सादर करुन त्यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर अशा व्यक्तिंना प्रवासासाठी वापरण्यात येणा-या वाहनाची निर्जतूकिकरण (Sanitised) करुन रवानगीची कार्यवाही त्या-त्या ठिकाणा वरुन करावी.

  ८) वाहनासोबत i) प्रवाशांची यादी (ii) Medical certificate (iii) Vehicle pass (iv) Route plan (v) सबंधित प्रवाशांचे undertaking certificate

➤ **नांदेड जिल्हयात राज्यांतर्गत/परराज्यातून येणा-या लोकांना जिल्हयात येण्यास परवानगी बाबतची कार्यवाही.**

१) राज्यांतर्गत/परराज्यातून नांदेड जिल्हयात येणा-या व्यक्तिंची सबंधित नोडल अधिकारी/ जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त होणारी यादी/जोडपत्र "ब" Annexure B मधील परवानगी वैद्यकिय प्रमाणपत्र, रुट प्लॅन, वाहनाची परवानगी, वाहनाचे प्रकार, प्रवासाचा कालावधी इत्यादी पत्रासह माहिती प्राप्त झाल्यानंतर ;

२) अशी माहिती या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर माझ्याकडे सादर करण्यास समन्वय अधिकारी श्रीमती वैशाली पाटील, तहसिलदार संगायो, डॉ.मृणाल जाधव, तहसिलदार संगायो (शहर) नांदेड, डॉ.संजय बिराजदार, तहसिलदार सर्वसाधारण यांनी माझ्या मान्यतेनंतर सबंधितांना परवानगीचे पत्र पाठवावे. व अशी प्राप्त यादी सबंधित तहसिलदार यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठवावी.

३) वरिल प्रमाणे येणारे व्यक्तिंची जिल्हयात प्रवेशाच्या ठिकाणी वैद्यकिय पथक गठित करण्यात यावे ज्यामध्ये पोलीस, महसूल व वैद्यकिय अधिकारी यांचा समावेश असावा. व या पथकामार्फत आलेल्या प्रत्येक व्यक्तिंची थर्मल गनव्दारे व ईतर अनूषंगिक तपासणी करुन तपासणीअंती आवश्यकतेनूसार होम कोरनटाईन किंवा Institutional quarantine करण्याची कार्यवाही करावी.

४) ज्या व्यक्तिंना होम कोरनटाईन करण्यात आले आहे अशा व्यक्तिंची पुढील १४ दिवसासाठी शहरीभागात महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत हे पाहतील ग्रामिण भागात सबंधित ग्रामसेवक हे पाहतील.

वरिल प्रमाणे सर्व सबंधित तहसिलदार यांनी अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांचे सनियंत्रणेत वेळेत जबाबदारी पार पाडावी.

आदेशाचे उल्लंघन करणा-यां कोणत्याही व्यक्ती,समूह यांचेविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अन्वये व भारतीय दंड संहिता कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**(डॉ. विपीन इटनकर)** भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**
मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड
२. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
३. पोलीस अधीक्षक, नांदेड
४. जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड
५. जिल्हा आरोग्य अधिकारी, नांदेड
६. सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
७. सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा यांना अनूपालनास्तव
८. सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपंचायत, जि.नांदेड
९. सबंधित तहसिलदार/जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड यांना अनुपालनास्तव.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

# Office of The ----------------------------

| | |
|---|---|
| **web-** www.nanded.gov.in | **email-** |
| **landline.** | **Fax No..** |
| Branch | No. |

Date-

Ref:- 1.Ministry of Home Affairs (MHA) order No 40-3/2020-Dm-I(A) Dated 19 April 2020

2.Hon.Chief Secretary,Government of Maharashtra Order No.DMU/2020/CR.92/DisM-1,

Dated: 30th April 2020

## VEHICLE PASS

**Vehicle No** :-.............................................................................

**Driver Name** :-.............................................................................

**Mob No** :-.............................................................................

**Valid upto** :-.............................................................................

**Route** :-.............................................................................

.............................................................................

**No Of persons in Vehicle:-**

Round seal

Incident Commander

Tahsil ----

District- Nanded

State- Maharashtra

Date-

## Medical Certificate

This is to certify that following people have been screened for COVID-19 by qualified medical team. They are not showing influenza like symptoms or symptoms of COVID-19. So these persons are allowed to travel from ________to________. All these persons are instructed to abide by the standard health protocol by the receiving state/ district.

(Enclosed herewith is the list of persons travelling.)

(Seal with signature)

दिनांक

# हमीपत्र

मी श्री/श्रीमती --------------------------------, वय----, वर्ष, रा.----------- तालूका----- जिल्हा------------------- येथील रहिवासी असून मी ----------- जिल्हयात प्रवेश केल्यानंतर कोरोना रोगाच्या अनूषंगाने माझी वैद्यकिय तपासणी केल्यानंतर वैद्यकिय अधिकारी यांच्या सल्यानूसार Home quarantine/Institutional quarantine होईल अन्यथा आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अन्वये व भारतीय दंड संहिता कलम १८८ नुसार होणारे कार्यवाहीस मी पात्र राहिल करिता हमीपत्र देत आहे.

हमीपत्र देणा-याचे नाव-

मो.नं.-